


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७६७. वा | शुक्रवार | दि. १० मे २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# जिल्हा सामान्य रुग्णालयातील तत्कालीन व कार्यरत अधिकारी नंबरी तर कर्मचारी दस नंबरी...

## भ्रष्टाचारी अधिकारी व कर्मचारी यांची पूर्व परिस्थिती व आजची परिस्थितीचा उलगडा पुढील सत्रात

## कोट्यवधी रुपये आलेला विविध निधी साहित्य उपकरणे,बांधकाम सर्व काही कागदोपत्रीच दाखवून काढली बिले

**पोस्टमार्टम ८१**







**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा रुग्णालयात बोकाळलेला भ्रष्टाचार व अनागोंदी अवध्या जगासमोर उघड करण्यासंदर्भात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने प्रयत्न करीत असताना, रुग्णालयाच्या कामकाजासंदर्भात अनेक धक्कादायक माहिती आता समोर येऊ लागली आहे. जिल्हा रुग्णालयात सध्या जो काही गलथानपणा आणि भ्रष्टाचार वाढलेला आहे, त्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रशासनाकडून प्रत्येक व्यवहारात गुप्तता पाळली जात आहे. म्हणूनच या ठिकाणी माहिती दडवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न होत आहेत. प्रसंगी माहिती अधिकार कायद्याचीही पायमल्ली येथे होताना दिसत आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने सर्वसामान्य, गरीब व गरजू नागरिकांना चांगल्या व दर्जेदार आरोग्य सुविधा मिळणे अपेक्षित आहे. परंतु सध्या येथील जिल्हा सामान्य रुग्णालय हे भलत्याच गोष्टींसाठी कुप्रसिद्ध होत चालले आहे. जिल्हा रुग्णालयाच्या बेबंद आणि भ्रष्टाचारी कारभाराच्या संदर्भात सातत्याने दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज पुढाकार घेऊन येथील कामकाज सुधारण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु जसजशी माहिती समोर येत आहे, तसतसा रुग्णालयात बोकाळलेला भ्रष्टाचाराचा भस्मासूर उघडा पडत चालला आहे. जिल्हा रुग्णालयात चालणारी टेंडरिंग प्रक्रिया, औषधी व साहित्य उपकरणांचे होणारे खरेदी-विक्रीचे व्यवहार, विविध प्रकारची विकासकामे, अधिकाऱ्यांच्या बदल्या व जबाबदाऱ्या देण्याची प्रक्रिया या सर्वच विषयांबाबत प्रचंड गुप्तता पाळण्यात येत आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनला सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार या ठिकाणी चालणारी टेंडरिंग प्रक्रिया प्रचंड आक्षेपार्ह अशी आहे. लायकी नसलेल्या, पात्रता नसलेल्या लोकांना टेंडर दिले जात आहे. त्यासाठी सर्व यंत्रणा व्यवस्थित मॅनेज केली जात आहे. जर अशा पद्धतीने टेंडरिंग झाले तर कोणतेही काम व्यवस्थित होणार नाही हे निश्चित आहे. यासंदर्भात माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता, अक्षम्य टाळाटाळ केली जात आहे. अधिकारी एव्हढे निगरगट्ट, कोडगे आणि बेशरम झाले आहेत की, वारंवार माहितीची मागणी केली तरी अत्यंत बाष्कळ आणि खोटी कारणे देऊन माहिती देण्यास टाळाटाळ करीत असतात. माहिती अधिकार कायद्याची याठिकाणी प्रचंड पायमल्ली केली जात आहे. एव्हढी गुप्तता बाळगण्याचे एकच मुख्य कारण आहे आणि ते म्हणजे बेबंदपणे माजलेला भ्रष्टाचार. हा भ्रष्टाचार उघड होण्याची भीती असल्या कारणाने कोणीही माहिती देत नाही. प्रत्येक अधिकारी दुसऱ्या अधिकाऱ्याकडे बोट दाखवून आपली कातडी वाचवण्याचा प्रयत्न करीत आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयात विविध विभागांच्या जबाबदाऱ्या ज्या अधिकाऱ्यांवर दिलेल्या आहेत, त्यातही प्रचंड घोळ आहेत. आरोग्य क्षेत्र हे अत्यंत संवेदनशील असे आहे. परंतु या ठिकाणी ज्यांच्यावर जबाबदाऱ्या आहेत, ते भलत्याच लोकांना आपल्या जागी बसवून दुसरीकडे कामे करीत आहेत. हा जनतेच्या आरोग्याशी चाललेला मोठा खेळ आहे. काही महिन्यांपूर्वी जिल्हा स्त्री रुग्णालयात एका महिलेच्या चुकीच्या ट्रीटमेंटमुळे त्या महिलेचा गर्भपात झाला.ती शाई वाळत न वाळत तर पुन्हा एक नवीन किस्सा झाला चिखली तालुक्यातील प्रसूतीसाठी आलेली महिला व तिच्या बाळाला वेळेवर उपचार न मिळाल्याने तो चिमुकला देवाघरी गेला उपचाराकरिता आलेल्या रुग्णासोबत नातेवाईकांना तेथील काही कर्मचाऱ्यानी चुकीची वागणुक दिल्याची नातेवाईकांनी जिल्हाशल्य चिकित्सकांना दोषींवर कारवाई व्हावी तक्रार दिली असून पुढे काय कारवाई होते त्याकडे जिल्हावासीयांचे लक्ष लागले आहे. जिल्हा रुग्णालय असो की महिला स्त्री रुग्णालय असो सगळीकडे बोंबच बोंब या ठिकाणीही अधिकाऱ्यांनी स्वतःवरची जबाबदारी कनिष्ठ व कंत्राटी कर्मचाऱ्यांवर झटकण्याचा प्रकार केला आहे. हे प्रकार या ठिकाणी सर्रास होत आहेत. दुसरीकडे बहुचर्चित भांडार विभागापासून रोखपाल विभागापर्यंत सगळीकडे भ्रष्टाचाराने कहर माजवला आहे. कोट्यवधींचे भ्रष्टाचाराचे आकडे अनेक लोकप्रतिनिधी व विविध सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी बाहेर काढले आहेत. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज द्वारा करण्यात आलेल्या तपासात असे दिसून आले आहे की, या ठिकाणी गेल्या काही वर्षांमध्ये २०० कोटींपेक्षा जास्त गैरव्यवहार झालेले आहेत. जिल्हा रुग्णालयाचे माजी रोखपाल पी. के. माळी असोत की विद्यमान रोखपाल आर. एस.लाकडे, या सर्वांनी कॅशबुकात खाडाखोड करणे, नियमबाह्य अव्वाच्या सव्वा बिले काढणे, असे प्रकार करून भ्रष्टाचाराला खतपाण घातले आहे. या भ्रष्टाचाराकडे जिल्हा शल्यचिकित्सक असो की दुसरे कोणी वैद्यकीय अधीक्षक सगळेजण एक तर डोळेझाक करीत आहेत किंवा थेट या भ्रष्टाचारातच सामिल झालेले आहेत. या सर्व गैरव्यवहारात अगदी खालपासून वरपर्यंत अधिकारी व कर्मचारी सामिल आहेत. अधिकारी नंबरी तर कर्मचारी दस नंबरी अशी स्थिती आहे.वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नियंत्रण नसल्यामुळे कर्मचारी देखील निर्ढावले असून, तेही मस्तवाल झालेले आहेत. अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराचा, दुर्लक्षितपणाचा फायदा कर्मचारी घेऊ लागले आहेत. चुकीच्या लोकांना टेंडर दिल्या गेल्याने भविष्यात या रुग्णालयाचे वाटोळे झाल्याशिवाय राहणार नाही. सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य सांभाळायचे असेल तर जिल्हा रुग्णालयात बोकाळलेला भ्रष्टाचार निपटून काढणे गरजेचे आहे. मात्र, भ्रष्टाचाराची साखळी आता इतकी मजबूत बनली आहे की, त्यासाठी फार मोठी सर्जरी जिल्हा रुग्णालयाच्या व्यवस्थेवर करावी लागणार आहे. भ्रष्टाचाराने संपूर्ण यंत्रणा पोखरली गेली असून, यंत्रणेच्या नसानसात भ्रष्टाचाराचे विष पसरले आहे. यासंदर्भात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने सातत्याने जिल्हाधिकाऱ्यांना उप संचालक अकोला यांना कारवाईचे आवाहन केलेले आहे. कारण यंत्रणेतील सर्वच भ्रष्टाचाराच्या तुंबलेल्या गटारात लोळत असल्यामुळे रुग्णालय प्रशासनाकडून कोणतीही कारवाई अपेक्षित नाही. मात्र जिल्हाधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सतत पाठपुरावा करीत आहे व करीत राहणार आहे. जोपर्यंत या ठिकाणी बोकाळलेला भ्रष्टाचार निपटून काढला जात नाही, तोपर्यंत ही निकराचे प्रयत्न आमचे सुरूच राहतील.

**कोट्यवधी रुपयांचा निधी मॉड्युलर ओटी व लेबर रूम प्रकरण पुढील पोस्टमार्टम सत्रात**

# भेंडवळची घटमांडणी आज, तर उद्या वर्तवणार भाकीत...

**जनसंचलन/ जळगाव जामोद**

विदर्भातील शेतकऱ्यांचे लक्ष लागून असलेल्या भेंडवडची घटमांडणी उद्या दि. १० मे रोजी संध्याकाळी होणार आहे, तर ११ मे रोजी सकाळी या घटमांडणीची भाकिते जाहीर केली जाणार आहेत. पूर्णा नदीच्या काठी वसलेल्या या गावात घट मांडण्याची परंपरा समारे ३०० वर्षांपासून सुरू आहे. परंपरा सुरू करणारे चंद्रभान महाराज यांचे वंशज पुंजाजी महाराज आणि त्यांचे सहकारी सारंगधर महाराज हे भविष्यवाणी जाहीर करतील. अक्षय तृतीयेच्या दिवशी संध्याकाळी गावा गावाबाहेरील शेतामध्ये घटाची मांडणी करण्यात येते. दसऱ्या दिवशी पहाटे घटांमध्ये झालेल्या बदलावरून आणि घटाच्या आतील धान्याचे सूक्ष्म निरीक्षण करून भाकीत वर्तविले जाते. त्यावरून पिकाचा आणि पावसाचा अंदाज व्यक्त केला जातो. कोणत्या महिन्यात पाऊस जास्त तर कोणत्या महिन्यात पाऊस कमी सांगितला आहे. यावरून शेतकरी यंदा कोणती पिके घ्यायची हे ठरवत असतात चंदभान महाराज यांनी सरू केलेली परंपरा पुंजाजी महाराज यांनी कायम ठेवली आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी सुद्धा गावातील हनुमान मंदिराच्या पारावर पूर्व मांडणी केली जाते. या दोन्ही मांडणीमध्ये साम्य असते. त्यामुळे या दोन्ही मांडणीचे निष्कर्ष एकत्र जोडून ही भाकिते वर्तवली जातात.याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

# आपत्कालीन परिस्थितीमध्ये समन्वयाने कार्य करावे-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

**जनसंचलन/बुलडाणा**

येत्या मान्सून कालावधीत प्रशासनाने आपत्कालीन परिस्थितीमध्ये सतर्क राहावे, पूर किंवा अपघाताची स्थिती ही अचानक उद्भवल्याने यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात आज मान्सून पूर्व तयारी आणि दुष्काळ व पाणीटंचाई संदर्भात केलेल्या उपाययोजनांच्या संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन, निवासी उपजिल्हाधिकारी निर्भय जैन, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, समाधान गायकवाड, जयश्री ठाकरे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी संभाजी पवार, तहसिलदार संजिवनी मुपडे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले, आपत्कालीन परिस्थितीमध्ये संपर्क, वाहतूक व्यवस्था आणि गोल्डन अवर या बाबी महत्वाच्या आहेत. त्यामुळे तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावरील आपत्कालीन कक्षांनी संपर्कात राहावे. पावसाळ्याच्या दिवसात वाहनांच्या अपघाताची शक्यता असल्याने प्रामुख्याने समृद्धी मार्ग असलेल्या तालुक्यातील यंत्रणांनी सतर्क राहावे. प्रामुख्याने वाहन घसरून अपघात होण्याची शक्यता असल्याने या भागात जेसीबी, गॅस कटर, रूग्णवाहिका आदींची व्यवस्था ठेवण्यात यावी. ग्रामीण भागातील पूराची स्थिती हाताळण्यासाठी गटविकास अधिकारी यांनी सजग व्हावे. पूराच्या परिस्थितीबाबत कोतवाल आणि पोलिस पाटील यांच्याकडून दवंडी देण्यात यावी. पूरपरिस्थिती हाताळण्यासाठी तालुकास्तरावर अंतर्गत बैठक घेण्यात यावी. तसेच प्रत्येक गावात ग्राम सुरक्षा समिती स्थापन करण्यात यावी. या समितीशी आपत्कालीन परिस्थितीत संपर्क साधता येईल. अतिवृष्टीच्या काळात वीज वितरण कंपनीने वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्नशील राहावे. शहरातील मॅनहोल उघडण्यात येऊ नये. उघडल्यास बॅरेकेटींग करण्यात यावे. पुराच्या काळात नागरिकांना स्थलांतरीत करण्याची आवश्यकता भासल्यास निवारा केंद्राच्या ठिकाणी सुविधा पुरविण्यात याव्यात. पूर परिस्थितीमध्ये पावसाच्या प्रमाणावर लक्ष ठेवण्यात यावे. त्यासाठी आंतरजिल्हा समन्वय ठेवण्यात यावा. नागरिकांना मदत करण्यासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करावेत. पूराच्या काळात सार्वजनिक उद्घोषणेची व्यवस्था करण्यात यावी. वादळी वाऱ्यामुळे रस्त्यावरील वाळलेली झाडे उन्मळून पडून घरे, वाहनांचे नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशी झाडे तोडण्यात यावी. धरण क्षेत्रात




पाऊस जादा झाल्यास पाणी सोडण्यात येते. याची माहिती बाधित क्षेत्रातील नागरिकांना देण्यात यावी. पाणी सोडल्यामुळे शेती आणि घरांचे नुकसान होऊ नये, याची काळजी घ्यावी. उन्हाळ्याच्या कालावधीत चाराटंचाई जाणवणार नाही, यासाठी नियोजन करण्यात यावे. शहरातील पाणी पुरवठा सुरळीत राहण्यासाठी प्रयत्न करावेत. आवश्यकता पडल्यास टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तसेच कुपननलिका आणि विंधन विहिरी अधिग्रहित करण्यात येत आहे. येत्या कालावधीत आवश्यकतेनुसार पाणी पुरवठ्याच्या उपाययोजना करण्यात येतील. जलजीवन मिशनचा आढावा घेण्यात यावा. गाळमुक्त धरण, गाळयुक्त धरण उपक्रम राबविण्यात येत आहे. स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने गाळ काढण्यात येत आहे. यामुळे पाणीसाठा वाढण्यास मदत होणार असल्यामुळे यंत्रणांनी सहकार्य करावे. तसेच पाणीपुरवठा करणाऱ्या योजनांनी पाण्याचे स्त्रोत तपासण्यात यावे, अशा सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी दिल्या.

# बियाणे, खते, किटकनाशकांच्या तक्रारीबाबत कार्यपद्धती निश्चित

**जनसंचलन/बुलढाणा**

येत्या खरीप हंगामाच्या पूर्वतयारीला सुरवात करण्यात आली आहे. त्यानुसार कृषि निविष्ठा असलेल्या बियाणे, खते, किटकनाशकांच्या तक्रारीबाबत कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी या कार्यपद्धतीचा अवलंब करावा, असे आवाहन कृषि विभागाने केले आहे. खरीप हंगाम २०२४ करीता गुणवत्ता नियंत्रण कामाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार शेतकऱ्यांना कृषि निविष्ठा विक्रेत्याकडून विक्री होणाऱ्या बियाणे, खते, किटकनाशके आदी निविष्ठांचा दर्जा निकृष्ट असणे, त्यात भेसळ असणे अथवा बोगस असणे आदीबाबत शेतकऱ्यांकडून प्रत्यक्ष अथवा अन्य व्यक्ती, संस्था, प्रसिद्धी माध्यमाद्वारे तक्रारी प्राप्त होतात. सदर तक्रारी सादर करताना शेतकऱ्यांनी अर्ज, मुळ देयक, बियाणे, खते व किटकनाशकाची पिशवी, टॅग, वेष्टन आदी तालुका तक्रार निवारण समितीचे सदस्य सचिव, कृषि अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे सादर करावेत. त्यासाठी बियाणे, खते, किटकनाशके आदी निविष्ठांच्या गुणवत्ता नियंत्रणाच्या अनुषंगाने कार्यवाहीबाबत तक्रार निवारण समिती कार्यरत आहे. या समितीचे अध्यक्ष, उपविभागीय कृषि अधिकारी, तर तालुका कृषि अधिकारी, कृषि विद्यापीठ, कृषि संशोधन केंद्र, कृषि विज्ञान केंद्राचे प्रतिनिधी, महाबीज प्रतिनिधी, कृषि अधिकारी, पंचायत समिती हे सदस्य राहणार आहेत. तक्रार करावयाच्या कार्यपद्धतीबाबत शेतकऱ्यांनी कृषि अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे तक्रार अर्ज सादर केल्यानंतर तालुका तक्रार निवारण समिती ही स्थळ पाहणी करेल. तसेच तक्रारदार शेतकऱ्यांना पंचनामा देतील. या पंचनाम्याच्या आधारे शेतकऱ्यांना जिल्हा ग्राहक न्यायालय येथे दाद मागता येऊ शकेल. जिल्हा ग्राहक न्यायालय येथे दाद मागण्याकरीता आवश्यक दस्ताऐवज व मागदर्शन करण्यात येणार आहे, असे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी कळविले आहे.

# कंट्रोलसाठी हँडब्रेक ओढल्याने कार उडाली हवेत; दोन जखमी

## खामगाव-शेगाव रोडवरील नवोदय विद्यालयाजवळील घटना




**जनसंचलन/ खामगाव**

भरधाव असलेली कार नियंत्रित करण्यासाठी अचानक हॅण्डब्रेक ओढल्याने अनियंत्रित कार चक्क हवेत उडाली. त्यानंतर रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतात जाऊन आदळली. खामगाव - शेगाव रोडवरील नवोदय विद्यालयाजवळ बुधवारी दुपारी ही घटना घडली. यात महिलेसह दोघे जण जखमी झाले. प्राप्त माहितीनुसार, एमएच २८ एझेड ६११४ क्रमांकाची कार खामगाव येथून शेगावकडे जात होती. दरम्यान, नवोदय विद्यालयाजवळ चालकाने अचानक हॅण्डब्रेक ओढला. त्यामुळे आधीच अनियंत्रित असलेली कार जागेवर थांबण्याऐवजी हवेत उडून रस्त्यालगतच्या शेतात जाऊन आदळली. यात चालकासह एक महिला गंभीर जखमी झाली. प्रत्यक्षदर्शींनी कारमधील दोघांना तत्काळ शेगाव येथील रुग्णालयात उपचारार्थ दाखल केल्याचे समजते. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी शेगाव ग्रामीण पोलिस पुढील तपास करीत असून, अपघात घडला त्यावेळी अनेकांच्या जिवाचा थरकाप उडाला होता.

# रेती तस्कराला सिंदखेडराजा तालुक्यातील अवैध रेती उत्खननाचे खड्डे बुजविण्यासाठी मुहूर्त सापडेना...

## मुहूर्त शोधण्यासाठी लाच खोर महसूल कर्मचाऱ्यांची धावपळ?

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

तालुक्यातील दरोज खडकपूर्णा नदीपात्रातून लाखो ब्रास रेती ची अवैध तस्करी लाच खोर महसूल कर्मचाऱ्यांच्या आशीर्वादाने सुरू असून सदर चोरी प्रकरणात आपल्या कर्मचाऱ्यांचा बळी जाऊ नये यासाठी रेती तस्कर,व महसूल विभागातील रेती संदर्भात हात ओले केलेले कर्मचारी व रेती तस्कर सिंदखेडराजा तालुक्यातील खडकपूर्णा नदीपात्रातून लाखो ब्रास अवैध चोरी केलेल्या ठिकाणचे खड्डे बुजविण्यासाठी प्रयत्नांत आहे तर या प्रकरणात कोट्यावधी रुपयांची माया जमवून प्रशासनात समाजात आपली स्वच्छ प्रतिमा दाखवण्यासाठी रेती तस्कराला खड्डे बुजविण्यासाठी मुहूर्त शोधण्यासाठी धावपळ करीत असल्याचे दिसून येत आहे याबाबत सविस्तर वृत्त असे की सिंदखेडराजा तालुक्यातील साठेगाव निमगाव वायाळ, डिग्रस,हिवरखेड पुर्णा,राहेरी, दुसरबिड पिंपळगाव कुडा,लिंगा,ताडशिवणी,येथे मोठ्या प्रमाणात अवैध रेती उत्खनन झाले असून सिंदखेडराजा येथे सदर प्रकरणात रेती तस्कर व अनेक महसूल कर्मचारी सदर खड्डे बुजविण्यासाठी प्रयत्न करीत आहे नुकतेच रूजू झालेले उपविभागीय अधिकारी प्रा संजय खडसे हे आनेक दैनिक मध्ये अवैध रेती उत्खनन संदर्भात बातम्या प्रकाशित झाल्यानंतर अँक्शनमोडवर असून तालुक्यातील अवैध रेती उत्खनन बंद करण्यासाठी रात्री पथकासोबत गस्तीवर राहून तस्करी रोखण्यासाठी विविध प्लॉन तयार केले असल्याने तस्कर व महसूल कर्मचाऱ्यांत दहशत निर्माण झाली आहे तसेच त्यांनी अवैध उत्खनन झालेल्या ठिकाणी भेट दिली असल्याने रेती तस्कर व लाच खोर महसूल कर्मचाऱ्यांची पितळ उघडे पडणार असल्याने या दोघांनी संयुक्त मोहीम काढून नदीपात्रातील अवैध उत्खननाचे खड्डे बुजविण्याचा मार्ग अवलंबल्याचे परिसर चर्चा असून सदर खड्डे बुजविण्याचे मोहीम हाती घेणार असल्याचे उघड होत आहे सदर नदीपात्रातील खड्डे बुजवलयास महसूल कर्मचाऱ्यांची समाजातील प्रतिष्ठा कायम राहून होणारी कारवाई टाळण्यासाठी ते प्रयत्नात आहे उपविभागीय अधिकारी प्रा संजय खडसे यांनी बोलताना सांगितले की सिंदखेडराजा तालुक्यातील अवैध उत्खनन झालेल्या ठिकाणचे मोजमाप करून दोषी तस्कर महसूल कर्मचाऱ्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल यामुळे महसूल कर्मचाऱ्यांची धाबे दणाणले असल्याने अवैध उत्खनाचे खड्डे बुजविण्याचा तयारीत आहे

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अवैध रेती उत्खननाने निमगाव वायाळ येथील कोल्हापुरी बंधारा धोक्यात...

## कोल्हापुरी बंधारा जवळील वाळू उपसा बंद करण्याचे पाटबंधारे विभागाचे तहसिलदाररांना पत्र

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

तालुक्यातील खडकपूर्णा नदीपात्रातून अवैध रेती उत्खनन खुलेआम वाहतूक सुरू आहे सदर वाळु उत्खननामुळे निमगाव वायाळ येथील कोल्हापुरी बंधारा चे अस्तित्व धोक्यात आले असल्याने बंधारांची पावसाळ्यात मोठी हानी होऊन बंधारा वाहून जाण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने उपविभागीय अधिकारी पाटबंधारे मेहकर यांनी सिंदखेडराजा तहसिलदार यांना ७ मे रोजी पत्र देऊन कोल्हापुरी बंधारा जवळील वाळू उपसा बंद करण्याची मागणी केली आहे याबाबत सविस्तर वृत्त असे की सिंदखेडराजा तालुक्यातील निमगाव वायाळ येथील कोल्हापुरी बंधारा जवळील १०० ते २०० फुटांवर मोठ्या प्रमाणात अवैध रेती चे उत्खनन सुरू आह



उपरोक्त विषयानुसार या कार्यालयांतर्गत सिंचन शाखा, दुसरबीड अंतर्गत असलेल्या निमगाव वायाळ कोल्हापुरी बंधारा जवळ वाळू उपसा चालू असल्याचे निर्दशनास आले आहे. सदर बंधाऱ्याजवळ वाळू उपसा करीत असल्याने बंधाऱ्यास धोका निर्माण होऊ शकतो. तरी संबंधितांना सुरक्षित अंतर राखून वाळू उपसा करण्यास परवानगी द्यावी जेणे करून बंधाऱ्यास कोणताही धोका निर्माण होणार नाही. करीता पत्रव्यवहार केला आहे मात्र संबंधित पत्रव्यवहारावर महसूल विभाग कारवाई करून वाळूत उत्खनन बंद करेल का या पत्राला केराची टोपली दाखवेल यावर ग्रामस्थांचे लक्ष लागून आहे

# दुचाकी व एसटी बस मध्ये अपघात १ युवक ठार तर १ जखमी मूर्ती फाट्या जवळील घटना....

**जनसंचलन/मोताळा**



कोथळी येथून दोघे मित्र दुचाकीवर आपल्या मित्राच्या लग्नासाठी निघालेले होते लग्नाला जात असताना त्यांची एसटी बसला धडक होऊन त्यामध्ये एका मित्राचा मृत्यू तर दुसरा मित्र गंभीर जखमी झाला आहे सविस्तर वृत्त अशे की दुचाकी व एसटी बसची धडक होऊन झालेल्या अपघातात दुचाकीस्वार वैभव गणगे ठार तर त्याचा मित्र गंभीर जखमी झाला. मोताळा तालुक्यातील मूर्ती फाटा येथे गुरुवारी दुपारी ३ वाजेच्या दरम्यान ही दुर्घटना घडली. मोताळा तालुक्यातील कोथळी येथील वैभव गणगे हा लग्नासाठी मित्रासोबत (एम.एच १९ बि. ए.१२८७ क्रमांकाच्या) दुचाकीने जात होता. एसटी बस मध्ये (एम. एच ४० ए.एन ९९४१) धडक होऊन त्यामध्ये दुचाकीस्वार वैभव गणगे याचा जागीच मृत्यू झाला. तर त्याचा मित्र राजू बावणे हा गंभीर जखमी झाला. आहे. परिवहन महामंडळाची बस मेहकर येथून भुसावळला जात होती. बोराखेडी पोलिसांनी दोघांना बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविले. मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात येणार असून त्यानंतर पुढील कार्यवाही बोराखेडी पोलीस स्टेशनची कर्मचारी करीत आहेत.

# अक्षयतृतीयेला बालविवाह रोखण्यासाठी उपाययोजना लागू...

## बालविवाह केल्यास शिक्षा आणि दंडाची तरतूद

**जनसंचलन/बुलडाणा**

राज्यात बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ लागू करण्यात आला आहे. शुक्रवार, दि. १० मे रोजी अक्षय तृतीया असल्याने या दिवशी बाल विवाह होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर बालविवाह रोखण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. बालविवाह केल्यास शिक्षा आणि दंडाची तरतूद आहे. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ लागू असून याचे नियम महाराष्ट्र बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २०२२ देखील लागू आहेत. या अधिनियमानुसार बालविवाह आयोजित करणे अजामीनपात्र गुन्हा आहे. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ नुसार बालविकास प्रकल्प अधिकारी यांना शहरी, तर ग्रामीण भागासाठी ग्रामसेवक यांना बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित केले आहे. तसेच ग्रामीण भागाकरीता अंगणवाडी सेविका, तसेच शहरी भागाकरिता पर्यवेक्षिकांना सहाय्यक बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. अक्षयतृतीया या दिवशी जिल्ह्यात बालविवाह होऊ शकतात. यास प्रतिबंधक म्हणून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. पुरुषाने बालवधूशी विवाह केल्यास सदर पुरुषाला दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद आणि एक लाख रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. तसेच जाणीवपूर्वक बालविवाह ठरविणाऱ्यास, सोहळा पार पाडणाऱ्यास किंवा प्रोत्साहन देणाऱ्यास दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद आणि एक लाख रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. बालविवाह झाल्यास, संबंधित वर-वधूंचे आई-वडिल किंवा पालक व अन्य नातेवाईक, मित्र परिवार, मंदिरातील विश्वस्त, फोटोग्राफर, प्रिंटिंग प्रेस, वाजंत्री, सभागृह व्यवस्थापक, कॅटरिंग अशा सर्वांनी बालविवाह घडविण्यास प्रत्यक्ष मदत केली किंवा तो रोखण्यासाठी प्रयत्न केले नाहीत, जे अशा विवाहात



सामील झाले होते, अशा सर्वांना दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद व एक लाख रुपयांपर्यंतचा दंड होऊ शकतो. सोबत ग्रामसेवकांनी जन्म दाखल्याची खोटी नोंद केल्यास त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येणार आहे. दि. १० मे २०२४ रोजीच्या अक्षयतृतीयेला संभावित बालविवाहाच्या घटना रोखण्यासाठी सर्व यंत्रणांनी बालविवाह प्रतिबंधात्मक अधिनियमातील तरतुदीनुसार बालविवाह रोखण्याबाबत जनजागृती करण्यात आली आहे. तसेच बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे, असे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी कळविले आहे.

# उन्हाळी प्रशिक्षण, व्यक्तिमत्व विकास शिबीराचा समारोप

**जनसंचलन/बुलडाणा**



जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र, तसेच जिल्ह्यातील एकविध खेळांच्या संघटनांतर्फे दोन सत्रात जिजामाता क्रीडा व व्यापारी संकुलात उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण आणि व्यक्तीमत्व विकास शिबीर पार पडले. शिबीराचा समारोप शनिवार, दि. ४ मे रोजी करण्यात आला. शिबिराच्या समारोप कार्यक्रमाला जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय तिरंदाजी प्रशिक्षक तथा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी चंद्रकांत इलग, महाराष्ट्र राज्य ॲथलेटीक्स असोसिएशन उपाध्यक्ष गोपालसिंग राजपूत, तालुका क्रीडा अधिकारी लक्ष्मीशंकर यादव, नेहरु युवा केंद्राचे अजयसिंह राजपूत, मुख्याध्यापक गजानन इंगळे, प्रशिक्षक विजय वानखेडे, सागर उबाळे आदी उपस्थित होते. यावेळी अजयसिंह राजपूत आणि गोपालसिंग राजपूत यांनी मार्गदर्शन केले. शिबीरात सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. शिबीरात राज्य क्रीडा मार्गदर्शक उज्वला लांडगे यांचे मार्गदर्शनाखाली विविध एकविध खेळ संघटनेचे तज्ञ मार्गदर्शक, राष्ट्रीय खेळाडू, प्रशिक्षकांनी प्रशिक्षण दिले. विजय वानखेडे यांनी मैदानी खेळ, उज्वला लांडगे, मनोज श्रीवास, अनिल चव्हाण यांनी हॅण्डबॉल, मोहम्मद इद्रीस यांनी कबड्डी, सागर उबाळे यांनी खो-खो, चंद्रकांत इलग यांनी आर्चरी, राहुल औशलकर यांनी फुटबॉल खेळाचे मार्गदर्शन केले. बी. एस. महानकर यांनी प्रास्ताविक केले. मनोज श्रीवास यांनी सूत्रसंचालन केले. राज्य क्रीडा मार्गदर्शक उज्वला लांडगे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी विनोद गायकवाड, सुहास राऊत, कृष्णा जाधव, तेजस्वीनी घाडगे यांनी पुढाकार घेतला.

# जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात बाळाचा मृत्यू; डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे बाळ दगावल्याचा नातेवाईकांचा आरोप!

## बाळाला झटके येत होते पण डॉक्टर तपासायला आलेच नाहीत..!

**जनसंचलन/ बुलडाणा**

बुलडाणा शहरातील धाड रोडवर असलेल्या जिल्हा स्त्री रुग्णालयात एका नवजात बाळाचा आज जन्मल्यानंतर ४ तासात मृत्यू झाला. नवजात बाळाला झटके येत होते मात्र बाळाला तपासायला जिल्हा स्त्री रुग्णालयात बालरोग तज्ञ डॉक्टरच नव्हते, डॉक्टर सकाळी येतील असे नवजात बाळाच्या आईवडिलांना सांगण्यात आले होते. अखेर रुग्णालय व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणामुळे नवजात बाळाचा मृत्यू झाला. आज ९ मे च्या पहाटे ही घटना घडली. दरम्यान संतप्त नातेवाईकांचा आक्रोश चिखली तालुक्यातील मेरा खुर्द येथील रहिवासी सलमा सदफ यांना प्रसूतीसाठी काल दुपारी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असताना पोटातील बाळाचे हृदयाचे ठोके जास्त असल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले होते. पुढील उपचारासाठी बुलढाणा येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात हलविण्याचे सांगितले, त्यानुसार गर्भवती सलमा सदफ यांना बुलढाण्यातील धाड रोड वरील स्त्री रुग्णालयात रात्री उशिरा भरती करण्यात आले. त्यानंतर रात्री ठीक १:४० वाजता सलमा सदाफ यांनी नवजात बालिकेला जन्म दिला. त्यांनतर चार तासानंतर नवजात बाळाचे शरीर झटके देत होते. ते पाहून नुकतेच बाप झालेले सय्यद शफात यांच्यासह उपस्थित नातेवाईकांनी वार्डातील कर्मचाऱ्यांना आवाज दिले. त्यांच्याजवळ जावून बाळा विषयी अत्यंत धडपडीणे सांगत होते. शेवटी सकाळी पाच वाजेच्या दरम्यान सय्यद शफात यांनी आपल्या बाळाला उचलले आणि रेफर लेटर ची मागणी केली. ते, मिळताच त्यांनी जिल्हा सामान्य रुग्णालय गाठले परंतु बाळाचे उपचार सुरू होण्याआधी बाळाचा मृत्यू झाला. दरम्यान , या घटनेनंतर नातेवाईकांनी स्त्री रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रशांत पाटील यांच्याशी तब्बल दोन तास बातचीत केली. व कामात हलगर्जी करणाऱ्या दोषी कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली त्यांनतर प्रसूतीतज्ञ डॉक्टर, तसेच एक महिला कर्मचारी यांच्यावर देखील कारवाई करण्याची मागणी नातेवाईकांनी केली आहे. प्रकरणाचा पुढील अहवाल डॉ. प्रशांत पाटील तयार करत असून बालकाच्या मृत्यूस जबाबदार असलेल्यांवर निश्चितच कारवाई होणार असल्याचे त्यांनी सांगितले. सिटी न्यूज टीमने डॉक्टर प्रशांत पाटील यांच्याकडून झालेल्या घटने विषयी चर्चा केली असता त्यांनी सांगितले की आपल्याकडे डॉक्टर नसल्याने आपण कॉलवर डॉक्टर यांना बोलावतो रात्रीच्या वेळेस तिथे डॉक्टर नसल्याने सिस्टर कर्मचारी व सहकारी होते. दुसरे असे की कर्मचारी निलंबन कारवाईत चुकून जी महिला कर्मचारी चव्हाण ही सुटीवर व सामान्य रुग्णालयात कार्यरत होती तिचे नाव हे चुकून कारवाईत आले त्याची संपूर्ण चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे माहिती डॉक्टर प्रशांत पाटील यांनी दिली.

### बेजबाबदार डॉक्टरांची नातेवाईकांना अरेरावी!

**रात्री डॉ. योगेश शिंदे हे कर्तव्यावर असून देखील रुग्णापर्यंत पोहोचले नाही असा आरोप करण्यात येत आहे. दरम्यान, आज मृतक बालिकेचे नातेवाईक त्यांच्याशी बोलत असताना डॉ. शिंदे यांनी अरेरावी केली असेही बोलले जात आहे.**



### प्रशासनाने चूक मान्य केली! जिल्हा शल्य चिकित्सक म्हणाले

**यासंदर्भात मृतक बालकाच्या वडिलाने माहिती देताना सांगितले की, मध्यरात्री कर्तव्यावर असलेले रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे बाळाचा मृत्यू झाला आहे, त्यामुळे त्यांच्यावर कठोर स्वरूपाची कारवाई झाली पाहिजे. याविषयी त्यांनी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुभाष चव्हाण यांना सांगितले असता प्रकरणाचा आढावा घेतल्यानंतर कर्मचाऱ्यांची चूक असल्याचे नमूद केले आहे.**

# अपघातामध्ये दुचाकीस्वारांचा मृत्यू अधिक परिवहन विभाग उपाययोजना करणार

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील अपघाताच्या आकडेवारीमध्ये दुचाकीस्वारांचा मृत्यू होण्याचे प्रमाण अधिक आहे. हे प्रमाण कमी करण्यासाठी परिवहन विभागातर्फे विविध उपाययोजना करण्यात येणार आहे. यात प्रामुख्याने हेल्मेटचा वापराची सक्ती करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येणार आहे. गेल्या जानेवारी ते डिसेंबर २०२३ मध्ये एकूण ६२८ अपघात झाले आहेत. यातील ३०८ अपघातात ३८७ मृत्यू झाले आहे. यावर्षी जानेवारी ते मार्च २०२४ या तीन महिन्याच्या कालावधीत १९२ अपघात झाले असून १०१ जणांचा मृत्यू झाला आहे. १९२ अपघातांमध्ये सर्वाधिक ८३ अपघात दुचाकीचे झाले आहेत. तसेच ३४ चारचाकी वाहन, ६९ जड वाहने, ६ तीनचाकी वाहनांचा अपघात झाला आहे. गेल्या वर्षीच्या तीन महिन्याच्या तुलनेत यावर्षी ३९ अपघात, तर २१ मृत्यू वाढले आहेत. टिप्परच्या धडकेने मृत्यू होत असल्याने टिप्परची तातडीने तपासणी करावी. याबाबत सातत्याने कार्यवाही करण्यात यावी. विना क्रमांकाच्या टिप्परवर तातडीने कार्यवाही करावी. अपघात रोखण्यासाठी गतिरोधक, माहितीसाठी फलक, वेगमर्यादेचे नियंत्रण असणे गरजेचे आहे. यासाठी बांधकाम विभागाने मोहिम घेऊन गतीरोधकांवर पांढऱ्या पट्ट्या आखाव्यात, रस्त्याच्या कडेला फलक लावून संदेश देण्यात यावे. तसेच फलकावर मदतीसाठी पोलिस, रुग्णालयाचे संपर्क क्रमांक. जवळच्या रुग्णालयाची माहिती देण्यात यावी. अपघात प्रवण क्षेत्रात सूचना देणारे फलक लावण्यात यावे. तसेच रस्ता सुरक्षेसाठी उजव्या बाजूने चालावे, यासाठी जनजागृती करण्यात येणार आहे. दुचाकीच्या वाढत्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर परिवहन विभागातर्फे विविध उपाययोजना करण्यात येणार आहे. यात सुरवातीला एक महिना हेल्मेट वापरासंबंधी जनजागृती करण्यात येणार आहे. त्यानंतर प्रत्यक्ष कारवाई



करण्यात येणार आहे. यासोबतच वेगमर्यादा पाळणे, रस्त्याच्या उजव्या बाजूने चालणे, मादक पदार्थाचे सेवन करून वाहन चालवू नये याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील अपघातामध्ये दुचाकीचे अपघात होण्याचे प्रमाण अधिक आहे. अपघातात घरातील कर्त्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास कुटुंब उध्वस्त होते. तसेच महिलांवर जबाबदारी येते. त्यामुळे दुचाकी चालकांनी स्वत: आणि कुटुंबाच्या संरक्षणासाठी हेल्मेट वापरावे. दुचाकी चालविताना मोबाईलचा वापर टाळून बेकदारपणे वाहन चालविणे टाळावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# ट्रक व प्रवासी वाहन अपघातात एक ठार

**जनसंचलन/मलकापूर**




भरधाव ट्रक व प्रवासी वाहनाची समोरासमोर धडक झाल्याच्या अपघातात प्रवासी वाहन चालकाचा मृत्यू झाला, तर ४ चार जण जखमी झाले. राष्ट्रीय महामार्ग ५३ वर तांदुळवाडी पुलानजीक बुधवारी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. यासंदर्भात अधिक माहिती अशी की, ट्रक क्रमांक आरजे-११, जीबी ४९९७ मलकापूरकडून मुक्ताईनगरकडे जात होता. तर प्रवासी वाहन क्रमांक एमएच-१५, डीसी-९७१२ मुक्ताईनगरकडून मलकापूरकडे येत होते. दरम्यान, दोन वाहनांची जोरदार धडक झाली. या धडकेत वाहन चालक गोरख सुरेश मोहिते (३२), सप्तशृंगी गड, नाशिक हा गंभीररीत्या जखमी झाला, तर सुधाकर शालिग्राम धामोडे (७२, सप्तशृंगी गड), ऐश्वर्या उमेश बेलोकर (२०, नाशिक), आर्या मोहन गुरगुले (१४, नाशिक), प्रिया संतोष उन्हाले (४०, मुंबई) असे एकूण चार जण जखमी झाले. या घटनेची माहिती कळताच शिवसेना तालुका प्रमुख विजय साठे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष राजू साठे, वीटभट्टी मालक भाई, धनराज पाटील, वासुदेव जोगी आदींनी तातडीने घटनास्थळाकडे धाव घेतली. टोल नाक्यावरील रुग्णवाहिकेला तातडीने पाचारण करण्यात आले आणि जखमींना वाहनातून बाहेर काढून उपजिल्हा रुग्णालयाकडे रवाना केले. उपचारादरम्यान गंभीर जखमी असलेला चालक गोरख मोहितेचा मृत्यू झाला. इतर चार जखमींवर उपचार सुरू आहेत. या अपघातात वाहनांचाही चुराडा झाल्याचे दिसून आले. वाहनातील सर्व प्रवासी सप्तशृंगी गडावरून नांदुराकडे जात होते.